भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-२१/०८/२०१८

# प्रेसनोट

## वीस वर्षापासून जन्मठेपेची शिक्षा लागलेला फरारी आरोपी अटकेत

## भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

परभणी ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं ३५/१९९७ भादवि कलम ३०२ मध्ये आरोपी नामे रंगनाथ गणपतराव खरवडे रा.मु.पो.किन्होळा ता.जि.परभणी हा दाखल गुन्हयामध्ये जामीनावर असताना मा.सत्र न्यायाधीश सो। सेशन कोर्ट परभणी यांनी सेशन केस क्रमांक ८८/१९९७ अन्वये सन १९९८ मध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली नंतर सदरची केस मा.हायकोर्ट औरंगाबाद कोर्टाने सुध्दा जन्मठेपची शिक्षा कायम केली होती तेव्हापासुन सदर आरोपी हा दिले पत्यावर आजतागायत मिळुन येत नव्हता सुमारे २० वर्षापासुन फरार असल्याने त्याचे विरुध्द मा.सत्र न्यायाधीश परभणी यांनी नॉन बेलबेल वॉरंट जारी केले होते.

आज रोजी तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे पो.ठाणेस रात्रपाळी डयुटीस हजर असताना आरोपी नामे रंगनाथ गणपतराव खरवडे वय. ५७ वर्ष रा.मु.पो.किन्होळा ता.जि.परभणी हा कात्रज परिसरामध्ये रहावायस असल्याची माहीती प्राप्त झाली होती. पंरतु कात्रज परिसरामध्ये नक्की कोणत्या ठिकाणी रहावयास आहे याबाबत काही एक माहीती मिळुन येत नसल्याने बातमीदारामार्फत वरील आरोपीचा तपास केला असता असता तो अंजलीनगर वृदांवन कॉलनी गल्ली नं १ पाण्याचे टाकीजवळ कात्रज पुणे.या ठिकाणी राहणेस असलेबाबत खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने स्टाफसह त्याचा दिले पत्यावर जावुन शोध घेतला असता तो राहते घरी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन पुढील योग्य ती कारवाई कामी गुन्हे अन्वेषण विभाग परभणी यांचे ताब्यात दिलेले आहे.

**सदरची कारवाई मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवलदार विनोद भंडलकर, गणेश सुतार,समीर बागसिराज यांचे पथकाने केलेली आहे.**

Scanned by CamScanner